# शाहू महाराजांचे सामाजिक न्यायाचे तत्त्व

**प्रा.डॉ. रविंद्र भणगे**, प्राध्यापक, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

मो. ९४२०५२२८७२ Email- ravindrabhanage105@gmail.com

**प्रस्तावना:**

भारतीय समाजात सर्वांगिण समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व या त्रिसुत्रीवर प्रत्यक्ष कार्यवाही होऊन न्याय प्रस्थापित व्हावा म्हणून ज्यांनी आपले आयुष्य सर्वस्वी पणाला लावले, त्यामध्ये महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य अद्वितीय ठरले.

महात्मा जोतिबा फुलेंनी सर्व शुद्र–अतीशुद्रांच्या कल्याणाचा मार्ग सांगितला. त्यांनी वर्णविद्वेषी व्यवस्थेला सुरुंग लावण्याचे कार्य हाती घेतले. उच्चवर्णीयांची बलस्थाने ओळखली व बहुजनांच्या अधोगतीची कारणे शोधली. त्याचवेळी महात्मा फुलेंनी जाणले की, जोपर्यंत समाजाच्या सर्व क्षेत्रात शुद्र–अतिशुद्र प्रवेश करणार नाहीत तोपर्यंत त्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारणार नाही. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंच्या सहाय्याने स्त्री–शुद्रांसाठी शाळा उघडल्या. फुले दांपत्याच्या प्रयत्नाने स्त्री–शुद्रांना शिक्षणाचा अधिकार मिळाला. हा फक्त शिक्षणाचा अधिकार नव्हता तर माणूस असण्याचा, स्वत:ची विचारशक्ती, स्वत:च मान सन्मान जिवंत ठेवण्याचा अधिकार होता. त्यामुळे वर्ण आरक्षणाने निर्माण झालेल्या विषमतावादी व्यवस्थेवर जबरदस्त आघात झाला, वर्णव्यवस्थेला सुरुंग लागला. (पंडित नलिनी, (१९७८): ४६) महात्मा फुलेंनी पुढे याच कारणाने सन १८८२ रोजी हंटर कमिशनसमोर साक्ष देताना ब्राह्मणेतर जातीतील उमेदवारांना प्रशासकीय नोकरीत स्थान देण्याची पहिली मागणी केली. तसेच ग्रामीण व दलित विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी विशेष प्रलोभने (स्कॉलरशिप) ठेवावी अशी मागणी केली.

कोल्हापूर संस्थानचे राजे राजर्षी शाहू महाराज हे महाराष्ट्रातील वेगळे व्यक्तीमत्त्व होते. या व्यक्तीमत्त्वाने अनेक वेगळया गोष्टी करुन दाखवल्या आहेत. परंतु त्यांनी सामाजिक परिवर्तनाची चालू केलेली प्रक्रिया ही त्यांच्या कारकिर्दीतील अत्यंत मोलाची कृती आहे. कोल्हापूर सारख्या ऐतिहासिक परंपरेने थोर अशा संस्थानात रुढीप्रधान चातुवर्ण्यावर आधारित समाज जीवनात परिवर्तनाचे क्रांतीकारक स्वरुपाचे जे कार्य केले, त्याचे परिणाम दूरगामी झाले. त्याकाळी संपूर्ण महाराष्ट्र या विचारक्रांतीने ढवळून निघाला.

अधिकारग्रहण करताच छत्रपती शाहू महाराजांना बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत क्रांतिकारक बदल करण्याची गरज वाटू लागली. राजकीय स्वातंत्र्याला महाराजांचा विरोध नव्हता पण त्या स्वातंत्र्याअगोदर बहुजन समाजाला स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यासाठी पात्र बनविणे त्यांना नितांत आवश्यक वाटू लागले. छत्रपती शाहू महाराजांनी या कार्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य व्यतीत करण्याचा निश्चय केला. (पाटील, थोरात, पवार, (२०१५):३०,३१)

राजकारणात लागणारा मुत्सद्दीपणा, दूरदर्शित्व, योग्य माणसांची पारख व निवड करणारी गुणग्राहकता, धर्म व समाजसुधारकाला लागणारी क्रियाशीलता, सत्ता व संपत्तीची प्राप्त संधी लोकोद्वारार्थ उपयोगात आणण्याची तळमळ इत्यादी वैयक्तिक गुणाधिक्यामुळे संस्थानात व दूरवर बाहेरही राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य व त्याचा परिणाम यद्यपी महत्त्वाचा ठरतो. समकालीन भारतामध्ये जेव्हा एका बाजूला समकालीन संस्थानिक आणि राजेरजवाडे हे ब्रिटिशांपासून मिळणारा तनखा बंद होऊ नये आणि आपले संस्थान खालसा होऊ नये यासाठी प्रयत्नशील होते प्रसंगी ब्रिटिश सत्तेची दडपणे डोक्यावर घेऊन वावरत होते, त्याचवेळी अवघ्या वीस वर्षांचा हा आमचा लोकराजा रयतेच्या सुखासीन जीवनाची स्वप्ने बघत होता, ती साकारत होता. (राजहंस कपिल, (२०२०): १०,११)

**राजर्षी शाहू महाराज व आरक्षण:**

राजर्षी शाहू महाराज हे महात्मा फुले यांनी निर्माण केलेल्या आरक्षणाच्या विचारांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारे पहिले राजे होत. शाहू महाराजांनी मराठा, अस्पृश्य व मागासवर्गांची हालाखीची परिस्थिती जाणली. कारण १९०१ च्या जनगणनेत असे आढळून आले की, संस्थानामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय श्रेणीच्या नोकऱ्यांमध्ये एकही मराठा किंवा अन्य जातीचा

माणूस नाही. तेथे फक्त ब्राह्मणांची खोगीर भरती झालेली आहे. म्हणून २६ जुलै १९०२ साली राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थान भारतातील पहिले, 'समाजवादी आरक्षण' लागू केले. मराठा जातीसह अस्पृश्य, इतर मागास, भटके व विमुक्त या सर्वांसाठी त्यांनी नोकरीतील ५० टक्के जागा आरक्षित ठेवण्याचा अभूतपूर्व निर्णय घेतला. आम जनतेला शिक्षण द्यावे, स्वत:चे जीवनमान उंचावण्यास उद्युक्त करावे, अंधश्रध्दा नष्ट कराव्यात आणि जिच्यामुळे समाजात एक विलक्षण कृत्रिमता आली आहे. त्या विषमतेची कारणे समूळ नाहीशी करावीत या हेतूने राजर्षी शाहू महाराजांनी जिद्दीने सतत प्रयत्न केले. जातीच्या नावाने तयार झालेली बंधने नष्ट व्हावीत, यासाठी त्यांनी बहुमोल प्रयत्न केले. राजर्षी शाहू महाराजांचे समाजात न्याय प्रस्थापित करण्यासंबंधी बहुमोल असे योगदान असलेले दिसून येते. आरक्षण ही संकल्पना प्रथम महात्मा फुले यांनी मांडली. परंतु त्याला मुर्त स्वरुप देणेचे कार्य राजर्षी शाहू महाराज यांनी केले. आरक्षण हा न्यायप्रस्थापनेसाठी महत्त्वाचा घटक असल्याची बहुसंख्य समाजसुधारकांची भूमिका होती व त्यासाठी त्यांनी सातत्याने आग्रह धरला व प्रत्यक्ष कृती केल्या यासाठी प्राधान्यक्रमाची भूमिका छत्रपती शाहू महाराज यांनी घेतली. राजर्षी शाहू महाराज यांनी दलित व वंचित लोकांसाठी कायदे करुन त्याची अंमलबजावणी केली. सार्वजनिक धोरणात वंचितांना महत्त्व दिले गेले. दलितांना एक राजकीय स्थान प्राप्त झाले. १८७५ साली भारतावर ब्रिटिशांचे राज्य होते. अनेक संस्थानिक जनतेच्या हक्कापेक्षा व कल्याणापेक्षा स्वत:च्या सुखाकडे अधिक लक्ष देत होते. पण राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या राजे होण्याच्या संधीचा फायदा उठविला. जनतेचे हित हाच राज्यकारभार मानून त्यांनी वंचितासाठीच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक आणि शेतीच्या सुधारणा केल्या. वंचित लोकांच्या प्राथमिक गरजा पुर्ण करण्याकडे कटाक्षाने लक्ष दिले. तसेच परराष्ट्रांचा अभ्यास करुन चांगल्या गोष्टी आचरणात आणल्या. ब्रिटिश हिंदुस्थानातही जे प्रयत्न झाले नाहीत असे प्रयोग कोल्हापूर संस्थानाला नेहमीच महत्त्वाचे स्थान प्राप्त करुन दिले. याचे श्रेय राजर्षी शाहू महाराज यांनाच जाते.

**शाहू महाराजांचे सामाजिक न्यायाचे तत्त्व:**

स्वातंत्र्यपुर्वकाळात भारतातील अनेक संस्थानिकांनी, राजांनी सामाजिक सुधारणांचा प्रयत्न केला हे खरे आहे. पण, समाजक्रांतीनतर काय? शेवटचा टप्पा, शेवटचे स्टेशन कोणते? ते गाठायचे कसे? प्रवास कसा करायचा हे स्वप्न शाहू महाराजांनी पाहिले आणि या स्वप्नाचे नाव होते सामाजिक न्याय!

शाहू महाराजांनी घडवून आणलेल्या साऱ्या सामाजिक, शैक्षणिक सुधारणा सामाजिक न्यायाशी नाते सांगणाऱ्या होत्या, त्याकडे एक पाऊल टाकणाऱ्या होत्या. महाराज केवळ सुधारणावादी नव्हते. तर या सर्व सुधारणांच्या माध्यमातून त्यांना कठीण वाटणारे, व्यवस्थेने रोखून ठेवलेले सामाजिक न्यायाचे तत्त्व त्यांना साकारायचे होते. ते स्वत: युरोपचा दौरा करुन आले होते. भारतातील सामाजिक न्यायाच्या कल्पना, नागरिकांच्या समग्र विकासाच्या कल्पना त्यांच्या कानांवर आणि डोळयांवर आल्या होत्या. त्यांच्या स्वत:च्या कल्पनाही समाजाच्या आकलनातून आणि अर्थातच माणसांच्या आकलनातून जन्माला आल्या होत्या. पर्यावरणातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक विषमता आणि तिचे परिणाम पाहून विषमतामुक्त, बंधमुक्त माणूस आणि समाज जन्माला घालण्याचे स्वप्न त्यांच्या डोळयांसमोर उभे होते.

महात्मा फुल्यांची परंपराही त्यांना खुणावत होती. विशेष म्हणजे प्रजा सुखी ठेवण्याची प्रतिज्ञा त्यांनी राज्यरोहणाच्या प्रसंगीच घेतली होती. प्रजेला नुसतेच विकसित करायचे नव्हते, तर या विकासाचाही विकास म्हणजे केवळ भौतिक विकास नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, मानवीय आदींचा विकास करायचा होता. सामाजिक न्यायाचे तत्त्व वापरायचे होते आणि एकएक पाऊल पुढे टाकायचे होते.

असमानांना समानतेने वागवणे म्हणजे न्याय आणि तो व्यापक प्रमाणात विकसित करणे म्हणजे सामाजिक न्याय. माणसाने तयार केलेली विषमता मोडून काढणे, अत्यावश्यक, जीवनावश्यक गोष्टींचे योग्य वाटप करणे, ही सामग्री म्हणजे केवळ अन्न, वस्त्र, निवारा नव्हे, तर ज्ञान, दर्जा, समानता वगैरे; अस्पृश्यांना वेगवेगळया मार्गांनी आत्मसन्मानाची जाणीव करुन देणे, त्यांच्यातला गुलाम संपवून मुक्त माणूस जागा करणे, परंपरेने चालत आलेला आणि धर्ममान्य व समाजमान्य झालेला अन्याय संपवणे, आदर्श समाजव्यवस्थेसाठी प्रयत्न करणे, भेदाभेद न करता समाजातील सर्वांना विकासाची संधी प्राप्त करुन देणे आदी गोष्टींतून सामाजिक न्यायाची एक समग्र कल्पना जन्माला येत असते. (पवार जयसिंगराव, (२०१९):१३७४,१३७५) त्यावेळचे अनेक

संस्थानिक, राजे गरिबांची, अस्पृश्यांची पिळवणूक करुन, तिजोरी भरुन, ऐषआरामी जीवन जगत होते आणि इकडे करवीर संस्थानात स्वत:च्या सुखाची, आरामाची, तिजोरीची, प्रतिष्ठेची पिळवणूक करुन बिनचेहरेवाल्यांना सामाजिक न्याय द्यायचा होता. माणसासाठीच्या क्रांतीचा बिगूल वाजवायचा होता.

सामाजिक क्रांती म्हणजे जातिव्यवस्थेवर घाव, वेगवेगळया विषमतांवर घाव घालणे होय. तो घालण्यासाठी महाराजांनी मोठया धाडसाने आणि हिमतीने एका पाठोपाठ एक कायदे केले. त्यांची अंमलबजावणी करताना कसलीही तमा बाळगली नाही. या कायद्यांमुळे सामाजिक अभिसरणीचे वारे वाहू लागले. या वाऱ्यामध्ये आशय भरायचा होता आणि त्यासाठी कायद्याची अंमलबजावणी करण्याकरता, प्रबोधनाला गती देण्याकरता महाराजांनी प्रयत्न सुरु केले.

अस्पृश्यता हा आमच्या आत्म्यावरील कलंक आहे, असे डॉ. बाबासाहेब म्हणाले होते. हा कलंक पुसण्यासाठी शाहू महाराजांनी अनेक कायदे केले. जाहिरनामे काढले. या प्रयत्नांना कृतीची जोड मिळावी म्हणून अनेक ठिकाणी त्यांनी अस्पृश्यांबरोबर भोजन केले. मराठा—धनगर असा विवाह स्वत:च्या कुटुंबात तर घडवलाच; शिवाय अशा विवाहांचे, आंदोलनांचे मोहिमेत रुपांतर करण्याचा प्रयत्न केला. राजवाडयात, प्रशासनात जाहीर समारंभात अस्पृश्यांचा वावर वाढवला. शिरोळ येथे राजघराण्यातील सर्वांनी महारांच्या तक्क्यांत म्हणजे समाजमंदिरात अस्पृश्यांबरोबर भोजन घेतले. अस्पृश्यांच्या विकासात पहिला अडसर होता तो म्हणजे त्यांची जात, उतरंडीच्या सर्वांत तळात ती होती. सर्वांचे ओझे वाहणाऱ्या या जातींना कसलीही प्रतिष्ठा नव्हती.

सर्वप्रथम महाराजांनी गुन्हेगार जातींची हजेरी बंद केली. पारधी, बेरड वडार आदी अनेक जातींना ब्रिटिशांनी कायदा करुन जन्मजात गुन्हेगार ठरवले होते. सरसकट सर्वांना रोज पोलिस पाटलासमोर जाऊन हजेरी द्यावी लागत असे. काही झाले तरी हजेरी चुकत नसे. विशेष म्हणजे कोणतेही गुन्हे कधीही न केलेल्या माणसांनाही हजेरी सक्तीची होती. कारण, ते गुन्हेगारी जातीत जन्माला आले होते. २७ जुलै १९१८ ला एक जाहीरनामा काढून महाराजांनी केवळ हजेरीच बंद केली नाही तर यापैकी काही जातींचे पध्दतशीर पुनर्वसन केले. भाकरीच्या तुकडयासाठी त्यांना फिरावे लागू नये, भीक मागावी लागू नये, आत्मसन्मान गहाण टाकावा लागू नये म्हणून काहींना नोकऱ्या दिल्या. अगदी राणीच्या सेवेकऱ्यांमध्येही हे लोक नोकरदार म्हणून सहभागी झाले. प्रतिष्ठेचे जीवन ही सुध्दा सामाजिक न्यायातील एक महत्त्वाची बाब असते. महाराजांनी तिला पध्दतशीर हात घातला. सर्वप्रथम गुन्हेगारीतून मुक्तता, मग स्थैर्य व पुनर्वसन, मग प्रतिष्ठेचा रोजगार, मग राजकारणात आणि शिक्षणातही त्यांचा प्रवेश असे क्रमाक्रमाने सामाजिक न्यायाच्या शिडीवर एकएक पाऊल टाकले जात होते. नुसताच हजेरी बंदचा कायदा केला असता तर हजेरीतून सुटका झाली असती; पण त्यातून सामाजिक न्याय उगवला नसता. सन्मानाने जगण्याचा प्रश्न सुटला नसता.

समाजात अस्पृश्य ठरलेल्या मग नोकऱ्यातही अस्पृश्य ठरतो. सामाजिक न्याय, आत्मसन्मान, प्रतिष्ठा नाकारली जाते. महाराजांनी महसूल खात्यासाठी एक जाहीरनामा काढला आणि कार्यालयातील अस्पृश्य नोकराशी प्रेमाने, समतेने नाकारणाऱ्या अधिकाऱ्यांनी नोकऱ्या सोडल्या पाहिजेत, असे सांगितले. प्रत्येक माणसाला पशूप्रमाणे नव्हे तर माणसाप्रमाणे वागवा, असा हा जाहीरनामा सांगत होता. महाराजांनी आणखी एक पाऊल पुढे टाकले. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळू नये, असा ६ सप्टेंबर १९१९ तो जाहीरनामा होता. महाराज केवळ कायदेबहाद्दूर नव्हते तर कायदा घेऊन कुठे आणि कसे जायचे, हे त्यांना ठाऊक होते. ते ठिकाण गाठण्यासाठी टप्प्याटप्प्याने ते पावले टाकत होते. सर्व शासकीय खात्यांत अस्पृश्यांना नोकरी दिली पाहिजे आणि तत्पूर्वीच मंजूर झालेल्या आरक्षण कायद्याची अंमलबजावणीही केली पाहिजे, या हेतुने अनेक महत्वाच्या खात्यांत अस्पृश्यांचा शिरकाव केला गेला. अल्पावधीत अस्पृश्य समाज वकील, कोचमन, तलाठी, हुलस्वार, शिलाईकार, जमादार, पोस्टिलियन अशा वेगवेगळया पदांवर दिसू लागला.

महाराज केवळ सुधारणावादी नव्हते, तर सामाजिक न्यायाचे महान प्रणेते, महान पाठीराखेही होते. ज्या गावाने अस्पृश्यांना गुलाम केले होते, अशा काही गावांत अस्पृश्य तलाठी बनून गेला. खऱ्या अर्थाने गावाचा कारभारी झाला. अस्पृश्यांसाठी तलाठयांच्या जागा नुसत्याच जाहीर केल्या गेल्या नाहीत, तर तेथे जाण्यासाठी आवश्यक पात्रता तयार करुन घेतली. या पदाच्या परीक्षेत अस्पृश्य उत्तीर्ण व्हावेत, यासाठी त्यांना शिकवण्या, शिष्यवृत्त्या देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवला. तलाठीपद विशिष्ट जातीतून खुले केले.

सामाजिक न्याय कायदा करुन किंवा सरकारी खात्याला तसे नाव देऊन तयार करता येत नाही. ती एक लांब पल्ल्याची आणि गुंतागुंतीची प्रक्रिया असते. वेगवेगळया टप्प्यांतून जावे लागते. हे टप्पे काही वेळा नैसर्गिकरित्या जन्माला येतात. उदा. बलुते बंद झाल्यावर आणि जगायचे कसे? जगण्याचे पर्यायी साधन कोणते? असे प्रश्न तयार होतात. अशा अनेक संभाव्य प्रश्नांचा महाराजांनी अगोदरच विचार केलेला असायचा. त्यांची आखणी तयार असायची. धक्कातंत्राचा अवलंबन न करता; शिक्षण, प्रबोधन, कायदा, विचार आदी आयुधे वापरत ते सामाजिक न्यायाकडे जात होते. नुसता अन्न, वस्त्र, निवारा हा त्यांचा कार्यक्रम नव्हता, तर समाजजीवनात जेवढी म्हणून प्रतिष्ठेची क्षेत्रे असतील,तेथे अस्पृश्यांना ते संधी देत होते. विशेष म्हणजे या संधीकडे जाण्यासाठी जी आवश्यक पात्रता मिळवावी लागते, ती अस्पृश्यांनाही मिळावी यासाठी महाराजांचे समांतर प्रयत्न चालू होते. केवळ भूतदयेपोटी, केवळ उदारमतवादी होऊन आपल्याला नेमले गेले आहे, अशी भावना त्यांनी अस्पृश्यांमध्ये निर्माण होऊ दिली नाही. नोकऱ्यात महत्त्वाच्या जागी जाणे हा त्यांचा हक्कच आहे आणि तो मिळवून कर्तबगारी सिध्द करण्याची क्षमता त्यांच्यात आहे, हेही महाराज वरच्या समाजाला सांगू पाहात होते. पोलीस गेटवर सोळा अस्पृश्यांची त्यांनी केलेली नेमणूक असेल, नगरपालिकेत एक विषय समितीच्या चेअरमनपदी अस्पृश्यांची केलेली नेमणूक असेल या सर्वामागे अस्पृश्यांना समानता, प्रतिष्ठा, आत्मसन्मान आणि अर्थातच सामाजिक न्याय मिळावा, अशी भावना होती. या भावनेतून कधी कायदा, कधी नियम, कधी जाहीरनामा तर कधी अस्पृश्यांना छळणाऱ्यांना थेट असा हा मार्ग सुरु होता.

सामाजिक न्यायाकडे जाण्याचे महाराजांचे टप्पेही मोठे विलक्षण होते. गंगाराम कांबळे या त्यांच्या सेवकाच्या उदाहरणावरुन ही गोष्ट आणखी स्पष्ट करता येऊ शकते. गंगाराम हा पागेतील मोतद्दार होता. एकदा त्याने मराठयांसाठी असलेला हौद शिवला. अर्थातच, तेव्हाच्या रुढीनुसार तो बाटला. मराठा सेवकांनी गंगारामला त्याची पाठ फुटेपर्यंत, तो रक्तबंबाळ होईपर्यंत मारले. दौऱ्याहून परतल्यावर महाराजांना ही बातमी समजली. महाराजांनी गंगाराम आणि आरोपींना हजर व्हायला सांगितले. ज्या चाबकाने गंगारामची पाठ फोडली होती, त्याच चाबकाने महाराजांनी आरोपींची पाठ फोडली. आरोपी महाराजांच्या जातीचे म्हणजे मराठा होते. न्याय देताना महाराजांनी जात आडवी येऊ दिली नाही. गंगारामची सेवाही माफ केली आणि नव्या व्यवसायासाठी त्याला प्रोत्साहन दिले.

सार्वजनिक जीवनात त्यांनी जातिभेदाच्या विरुध्द, अस्पृश्यतेच्या विरुध्द सर्वशक्तीनिशी जाहीररित्या प्रयत्न करुन त्यांना संपवण्याचा घाट घातला. त्यांनी अस्पृश्यांना मंदिर—प्रवेशाचा हक्क दिला. विविध नोकऱ्यांमध्ये त्यांची भरती करुन स्पृश्यास्पृश्य विचार बाजूला सारला. त्यांनी एका दलिताला कोल्हापूर नगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष केले. सर्व अस्पृश्यांना पाणवठे, शाळा आणि विश्रामगृहे खुली करुन दिली. सामाजिक समता प्रत्यक्ष व्यवहारात साधण्याचा महाराजांचा हा प्रयत्न महाराष्ट्राच्या इतिहासातला सर्वात महत्त्वाचा प्रयत्न म्हटला पाहिजे. (पवार जयसिंगराव, (२०१९):३४८,३४९)

गुणवत्ता धारण केल्याशिवाय ब्राह्मणेतरांना ब्राह्मणांशी स्पर्धा करता येणार नाही व खऱ्या अर्थी समतेची लढाई यशस्वी होणार नाही, याची शाहूंना जाणीव होती. त्यासाठी त्यांनी ब्राह्मणेतरांना शिक्षण देण्याचा कार्यक्रम आखला. त्यासाठी शाळा व मोफत वसतिगृहांची योजना आखली. त्यासाठी त्यांनी जातिनिहाय वसतिगृहे उघडली. अस्पृश्यांसाठी वेगळया शाळा व वसतिगृहे उघडली. आज आक्षेप घेतला जातो की, जातिनिर्मूलन करणाऱ्या शाहूंनी जातिनिहाय वसतिगृहे का उघडली? या प्रश्नाचे उत्तर तत्त्वज्ञानात व तर्कशास्त्रात नव्हते, तर कठोर वास्तवात होते. आपल्या कारकीर्दीच्या आरंभाला शाहूंनी जातवार वसतिगृहे स्थापन केलेली नव्हती. १८९६ साली त्यांनी स्थापन केलेले पहिले वसतिगृह सर्व जातिजमातीकरीताच होते. कोणत्याही जातीच्या विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये म्हणून एका न्यायाधिशाची वसतिगृहाच्या प्रमुखपदी नियुक्ती केली होती. (पवार जयसिंगराव, (२०१९): १३१) ब्राह्मणासहित सर्व जातींची मुले आलेली पाहून शाहूंना आनंद वाटला. परंतु काही दिवसांनी विपरीत घडले. वसतिगृहातील उच्चवर्णीय ब्राह्मण विद्यार्थी इतरवर्णीय विद्यार्थ्यांना हीन लेखू लागले; त्यांचा विटाळ मानू लागले; वेगवेगळया पंक्तींची मागणी करु लागले. परिणामत: ही मानहानी नको म्हणून इतर जातींच्या विद्यार्थ्यांनी वसतिगृहे सोडले व १९०० साली वसतिगृहात फक्त ब्राह्मण विद्यार्थी उरले. तीव्र जातिभेद शिल्लक असेपर्यंत प्रगतीसाठी प्रत्येकाच्या वेगळया व्यवस्था हाच सामाजिक समतेकडे पाहणारा व्यावहारिक मार्ग,

अशी ही शाहूंची भूमिका होती. याच भूमिकेमुळे त्यांनी १९०१ नंतर जातिनिहाय स्वतंत्र वसतिगृहाचा प्रयोग सुरु केलेला आहे.

३० जुलै १९१९ रोजी शाहू म्हणाले, "प्रत्येक जात आपल्या जातीच्या हिताकडे पाहाते व इतर जातींच्या हिताकडे दुर्लक्ष करते, ही भारतीय समाजकारणाची शोकांतिका आहे. समाजरचना एकदम बदलता येत नाही म्हणून मी या वस्तुस्थितीचा स्वीकार करुन त्यांना आपापल्या जातीची वसतिगृहे उभारण्यासाठी मी जातीने प्रोत्साहन दिले." (पवार जयसिंगराव, (२०१९): ३६८,३६९)

शाहू महाराजांची सूंपर्ण कारकीर्द सामाजिक न्यायाला वाहिलेली होती. कायद्यावर समाज उभा करता येतो, तसा तो शिस्तीवर आणि समृध्दीवरही उभा करता येतो; पण तो सामाजिक न्यायावर उभा करता येणे कठीण असते. त्यासाठी प्रथम जीवनाच्या विविध क्षेत्रात सामाजिक क्रांती घडवावी लागते. पण, तेवढीच घडवून प्रवास थांबवला की, सामाजिक न्याय जन्माला येत नाही. जगात क्रांत्या होतात; पण प्रत्येक क्रांतीतून सामाजिक न्याय जन्माला येईलच असे नाही किंवा आला आहे, असेही नाही. भारताला स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्षे झाली, तरी सामाजिक न्यायाचा दुष्काळच आहे. या सर्व पार्श्वभूमीवर महाराजांनी सामाजिक न्यायासाठी यशस्वी केलेल्या लढयांचा, कायद्यांचा आणि सुधारणांचा विचार केला पाहिजे. (पवार जयसिंगराव, (२०१९):१३८२)

शाहू महाराजांच्या कामाचा विस्तार प्रचंड आहे. समता, सामाजिक, न्याय, कला, क्रिडा ग्रंथनिर्मिती, संगीत, नाटक शेती, शिक्षण, आरक्षण, सहकार, जलसिंचन, दुर्बलांसाठी विशेष योजना, विविध जातीधर्मांसाठी वसतिगृहे अशी न संपणारी यादीच आहे. (पवार जयसिंगराव, (२०१९):१३८६) आपल्या एका भाषणात त्यांनी स्पष्टपणे सांगितले, "आमच्या धर्मात जातिभेदामुळे जो उच्च– नीचपणा आला आहे तशा प्रकारचा जन्मजात भेदभाव जगाच्या पाठीवर दुसऱ्या कोणत्याही धर्मात नाही." दलित समाजाला उद्देशून ते पुढे म्हणाले, "या जातिभेदाचे अत्यंत हिडिस स्वरुप जर कोठे असेल तर इतर जातीकडून तुम्हाला ज्या रीतीने वागवण्यात येते त्या रीतीत दिसून येते. तुम्ही आमचे बंधू असता तुम्हाला अस्पृश्य म्हणून लेखून मांजरे, डुकरे, कुत्री यापेक्षाही तुम्हाला नीचपणाने वागवण्यात येते. माझ्या राज्यात मागासलेल्या जातींना वर आणण्याबद्दल माझे जे प्रयत्न झाले आहेत त्याबद्दल उच्च म्हणविणाऱ्या एका सुशिक्षित जातीचा माझ्यावर घुस्सा झालेला आहे. परंतु ज्याप्रमाणे एखादा डॉक्टर किंवा लेडी डॉक्टर ही अगदी अशक्त व दुबळया मुलाला अन्न व औषधे देऊन त्याची जोपासना सर्वांपेक्षा विशेष काळजीने करुन त्याला इतर मुलांच्या जोडीला आणून बसवितात त्याचप्रमाणे आम्ही अस्पृश्य मानलेल्या लोकांना वर आणले पाहिजे. परंतु यावरुन ब्राह्मणाचे ठिकाणी माझा द्वेषभाव आहे असे मात्र मुळीच नाही."

**सारांश:**

शाहू महाराजांनी एक प्रशासक म्हणून नेहमीच आपल्या प्रजेच्या कल्याणाचा विचार केला. ते राज्यकर्ते असले तरी त्यांना वाटायचे की, संस्थानातील जनतेची सेवा करणे, हे आपले कर्तव्य आहे. त्यांनी जे जी गोष्ट केली, त्यात आपणास पुढील गोष्टी आढळतात. १) खोलवर विचार २) त्यातून पध्दतशीर नियोजन ३) चैतन्य आणि खंबीरपणा ४) यथार्थता आणि वस्तुस्थितीचे आकलन ५) राज्यकारभाराच्या सूक्ष्मतम तपशिलांकडे पाहण्याची मनाची तप्तरता ६) प्रतिष्ठा आणि अनौपचारिकपणा यांचा दुर्मीळ संयोग ७) प्रजेच्या गरजांना प्रतिसाद. त्यांच्या राज्यकारभाराची वैशिष्टये म्हणजे सचोटी, कार्यक्षम कार्यपध्दती, उत्साह, वस्तुस्थितीची जाणीव आणि प्रजेप्रति उचित जबाबदारी. महाराजांनी या सर्व कल्पना आपल्या अफाट वाचनातून आणि निरीक्षणातून हळूहळू बिंबविल्या होत्या. जरी राज्यकारभाराचे स्वरुप लोकशाही पध्दतीचे नव्हते तरी त्यांचा आत्मा लोकशाही स्वरुपाचा होता.

आधुनिक महाराष्ट्राचा इतिहासात आपल्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करुन त्यांची सर्वांगीण क्षेत्रात प्रगती घडवून आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू छत्रपती शाहू महाराज होत. विचारपूर्वक स्वीकारलेल्या सामाजिक किंवा राजकीय न्यायतत्त्वांच्या बाबतीत कोणतीही तडजोड न स्वीकारता, या तत्त्वांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेले असामान्य मानसिक धैर्य छत्रपती शाहू महाराजांजवळ होते. त्यांच्या कार्यामुळेच त्यांचे व्यक्तिमत्त्व केवळ कोल्हापूर संस्थानापुरतेच मर्यादित न राहता, अखिल महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातही लोकप्रिय झाले. एक आदर्श राजा, बहुजन समाजाचा नेता म्हणून असलेली त्यांची लोकप्रियता शेवटपर्यंत कायम टिकली. सर्वसामान्य माणसाचे कल्याण करणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानले व सर्व समाजालाही या कर्तव्याच्या

अनुरोधाने मार्गदर्शन केले. या काळात महाराष्ट्रात उच्च मानल्या गेलेल्या जातीने आपले सर्वांगीण वर्चस्व निर्माण केले होते व हे वर्चस्व टिकविण्यासाठी बहुजन समाजावर निरनिराळी सामाजिक व धार्मिक बंधने लादलेली होती. या बंधनांतून बहुजन समाजाची सुटका करुन, त्याला सुशिक्षित बनविण्याचे, जागृत करण्याचे व प्रगत बनविण्याचे कार्य छत्रपती शाहू महाराजांनी केले. आपल्या या कार्याविषयी होणारी प्रचंड टीका त्यांनी निर्भयपणे सहन केली. पण आपल्या ध्येयधोरणात व कार्यपध्दतीत बदल केला नाही. त्यांच्या या कार्यामुळेच असामान्य व्यक्तिमत्त्वाचा, बहुजन समाजाचा लोकनेता म्हणून त्यांना लोकप्रियता मिळाली.

एप्रिल १९२० मध्ये शाहू महाराजांना नाशिकच्या लोकांनी मानपत्र देऊन त्यांचा गौरव केला. हा गौरव स्वीकारल्यानंतर आपल्या भाषणात महाराज म्हणाले, “निरनिराळया जातींच्या पुढाऱ्यांना माझा एकच संदेश आहे, तुम्ही अदूरदृष्टींचे बनू नका. भविष्यकाळाकडे दृष्टी फेका, जातिभेद मोडणे ही जरुरीची गोष्ट आहे, जातिभेदाला पुष्टी देणे हे पातक आहे. आम्हा सर्वांच्या उन्नतीच्या मार्गात जातिभेद ही एक मोठी धोंड आहे. म्हणून ती धोंड काढून काढणे हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे. जातिसभा भरवा, पण त्या एक ध्येय गाठण्याची केवळ साधने आहेत हे विसरु नका. या जातिपरिषदांची अखेर म्हणजे जातिभेदाची अखेर करणे हीच असली पाहिजे. जातिभेद बळकट करण्यात या परिषदांचे पर्यवसान होऊ देऊ नका. (पवार जयसिंगराव, (२०१९):१५०२) राजर्षी शाहू यांचे जीवनकार्य म्हणजे सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी केलेला आमरण संघर्षच होता.

**संदर्भसूची:**

१. भणगे रविंद्र, (२०१६),‘आरक्षणाची वाटचाल आणि ओबीसी आरक्षण’, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
२. फडके य.दि., (१९८६), ‘राजर्षी शाहू आणि लोकमान्य’, श्रीविद्या प्रकाशन पूणे.
३. जाधव रमेश, (२०१६), ‘राजर्षी शाहू गौरव ग्रंथ’, महाराष्ट्र शासन चरित्र साधने प्रकाशन समिती मंत्रालय, मुंबई.
४. जाधव रमेश, (२०१६), ‘लोकराजा शाहू छत्रपती’, सुरेश एजन्सी, पुणे.
५. कीर धंनजय, (१९७०), श्री शाहू स्मारक व्याख्यानमाला, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
६. पवार जयसिंगराव, (२०१९),‘राजर्षी शाहू पंचखंडात्मक स्मारकग्रंथ’, खंडः एक, दोन आणि तीन, अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर.
७. पवार जयसिंगराव, (संपा), (२०१९),‘राजर्षी शाहू पंचखंडात्मक स्मारक ग्रंथ’, खंडः चार आणि पाच, अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर.
८. पवार जयसिंगराव, (२०१९),‘राजर्षी शाहू—एक दृष्टिक्षेप’, भाग्यश्री प्रकाशन, कोल्हापूर.
९. पंडित नलिनी, (१९७८),‘जातीवाद आणि वर्गवाद’, साधना प्रकाशन, पुणे.
१०. पाटील, थोरात, पवार, (२०१५), ‘महाराष्ट्रातील समाज सुधारक’, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
११. राजहंस कपिल, (२०२०),‘राजर्षी शाहूंना समजून घेताना’, संवाद प्रकाशन, कोल्हापूर.